दै. सकाळ दि 06-12-23

# दोन घटनेत दरोडे टाकणाऱ्या सहा जणांना दुहेरी जन्मठेप

## न्यायालयाचा निकाल; एक लाख २० हजाराचा दंड

**नांदेड, ता. ५ :** दोन दरोडे टाकणाऱ्या सहा जणांना अतिरिक्त सत्र न्यायाधीश शशीकांत बांगर यांनी दुहेरी जन्मठेप आणि प्रत्येकाला २० हजार रुपये दंड याप्रमाणे एकूण एक लाख २० हजार रुपये दंड ठोठावला आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, ता. आठ जुलै २०२० रोजी रात्री साडेनऊच्या सुमारास आकाश हा आपल्या भावासोबत दुचाकीवर लालवाडी तांडा (ता. कंधार) येथून झुनझुनवाडीकडे (ता.कळमनुरी) जात होता. त्यावेळी नांदेड - सोनखेड रस्त्यावर लक्की पेट्रोलपंपाजवळ दोन दुचाकीवरील दरोडेखोरांनी त्याच्या भावावर चाकुने हल्ला करून जखमी केले होते. त्यांच्या जवळून विविध साहित्यासह अडीच हजार रूपये रोख रक्कम लुटली होती. अशीच एक दुसरी घटना ता. नऊ जुलैच्या मध्यरात्री एक वाजता घडली. याबाबत देगलूर नाका येथील रहिवासी भाजीपाला व्यापारी चांद पाशा अब्दुल हफीज यांनी देखील पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती. हिरवी मिरची भरलेला टॅम्पो मुसलमानवाडी ते विद्यापीठ रस्त्यावरून येत असताना टेम्पो खराब झाला म्हणून दुसऱ्या टेम्पोमध्ये मिरचीचे पोते भरताना सहा चोरट्यांनी खंजीरचा धाक दाखवून चालकाच्या खिशातील आणि गाडीच्या डिक्कीमधील ५५ हजार १५० रुपये लुटले होते. या प्रकरणी नांदेड ग्रामीण ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता.

या गुन्ह्यात तत्कालीन पोलीस निरिक्षक प्रशांत देशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरिक्षक सुरेश थोरात, गोविंद खैरे, शेख असद यांनी तपास करून विकास सुभाष हाटकर, राजेंद्र उर्फ राजू हंबर्डे, प्रभाकर चिमनाजी थोरात, ईश्वर मारोतीराव हंबर्डे, दत्ताहरी हंबेर्डे, अनिकेत नाईकराव हंबर्डे या सहा जणांची नावे निष्पन्न केली. यातील काही आरोपी दोषारोपपत्र दाखल करेपर्यंत फरार होते. नंतर त्यांच्या विरुध्द पुरवणी दोषारोपपत्र दाखल करण्यात आले.

या प्रकरणात एकूण १५ साक्षीदारांनी जबाब नोंदवला. उपलब्ध पुरावाआधारे न्यायाधीश बांगर यांनी दोन दरोडे टाकणाऱ्या या सहा जणांना दुहेरी जन्मठेपेची शिक्षा आणि प्रत्येकास २० हजार रुपये रोख दंड असा एकूण दोन प्रकरणात एक लाख २० हजार रुपये दंड ठोठावला आहे. सरकार पक्षाच्यावतीने जिल्हा सरकारी अभियोक्ता रणजित देशमुख, अतिरिक्त सरकारी अभियोक्ता अनुराधा कोकाटे यांनी बाजू मांडली. नांदेड ग्रामीणचे पोलीस अंमलदार फय्याज सिद्दीकी आणि चंद्रकांत पांचाळ यांनी पैरवी अधिकाऱ्याची भुमिका पार पाडली.